COTTON Innovate

Weekly Newsletter from Central Institute for Cotton Research, Nagpur

Issue 4, Volume 6, June 2018 A weekly newsletter from ICAR-CICR

## ICAR-CICR organised one day farmers' workshop and *Beejmohotsav* at Girad, Wardha under "*Mera Gaon Mera Gaurav*"




The one day Farmers workshop on Integrated Management of Pink bollworm, FLD seed distribution programme and "Beejmohostav" was organised in collaboration with Magan Sangrahalaya Girad on 5th June, 2018 at Magan Sangrahalaya of Natural Farming Development Center, Girad, Tal. Samudrapur, Dist. Wardha. Dr. Nandini Gokte-Narkhedkar, I/C Head, Division of Crop Protection, ICAR-CICR welcomed all the participants and briefed about organizing farmers workshop at Girad She pointed out that different stakeholders including farmers, seed producers, ginners, state agriculture department, social organizations, NGO's, KVKs, State Agriculture Universities etc. need to work through their collective efforts for effective management of Pink bollworm in the next season. Dr. P. R. Vijayakumari, Principal Scientist (Seed Technology), acquainted the farmers about the seed production programme and guided the farmers about Suraj variety. Dr B.B. Fand Scientist (Entomology) gave detailed information to the stakeholders about integrated management of pink bollworm. He discussed the role of various aspects like termination of crop latest by first fortnight of January, crop rotation, adoption of early maturing varieties, sowing of next season's crop in June, installation of pheromone traps after 45 days of sowing, etc. for the management of pink bollworm in the next season. Dr S.P. Gawande, Scientist (Plant Pathology) delivered a lecture on 'Safe use of pesticides'. He called farmers attention mainly towards strict adherence to label claims, avoiding mixtures and overuse of pesticides and need based spray of only recommended chemicals. Dr. D.T. Nagrale delivered the talk on identification of diseases and integrated disease management in cotton. Thirty Tribal farmers from these villages have taken up demonstration trials under Tribal Sub Plan (TSP) programme. Demonstration trials will have H-8 (Bollgard II) cotton in one acre plot. Farmers were also informed about procedure for seed treatment with biofertilizers for sowing. Record of farmers participating in the programme under tribal sub plan was maintained along with suitable documentation. The seed distribution was also done under AICCIP FLD consisting of integrated cotton management practices and cotton inter cropping system. In addition to this, on 13th June, the seeds of Mung bean were distributed to 35 farmers for Cotton-Mung intercropping system under FLD programme at the hands of Dr S. M. Wasnik, Principal Scientist, (Agril. Extension), CICR, Nagpur. More than 200 farmers from 17 villages viz., Arvi, Mohgaon, Faridpur, Shivanphal, Jogingumpha, Girad, Kapsi, Korapna, Tavi, Pimpalgaon, Edlabad, Antargaon, Sawandi, Wadgaon, Hivra, Wagheda and Samudrapur were participated in workshop. Dr. Sarvanan, Scientist (Plant Breeding) proposed the vote of thanks.

मगन संग्रहालय समिती, वर्धा व
भारतीय कापूस अनुसंधान संस्थेच्या
प्रयत्नातून साकारत आहे.

# बीज उत्सव-२०१८

**बीज...**

झाडाचं ज्ञानाचं, शहाणपणाचं, अनुभवाचं, सांस्कृतिक वारस्याचं, संपन्नतेचं आणि समृध्दीचं...

**यास जपनार आहात की नाही !**

हजारो वर्षाच्या अनमोल संचिताला घालवून काय मिळविणार आहोत ? हे करायचं नसेल तर पुन्हा नव्याने मातीशी नाळ जोडीत,...

**नैसर्गिक-सेंद्रिय शेतीची कास धरा ।**

आपल्या परिसरातील चांगल्या व गुणविशेष वाणाचे जतन करा !

संगोपन व संवर्धन करा !

देशज् बीज संर्वधन अभियानात सहभागी व्हा ।

**तर मग चला !...**

नैसर्गिक शेती विकास केंद्र, गिरड येथे दि. ५ जून २०१८ रोज मंगळवार ला सकाळी ११ ते ३ वा. पर्यंत बीज उत्सव २०१८ चे आयोजन करण्यास आले आहे.

त्या सोबत शेतीचे तज्ञ मार्गदर्शक विविध पिक पध्दती विषयी मार्गदर्शन करणार आहे. ही अमूल्य वेळ दवडू नका.

सहभागी व्हा । चला तर मग आपल्या अनुभवाची देवाण - घेवाण करुया. आपला सहभाग राष्ट्र उभारणीच्या दृष्टीने, उालेलं एक महत्वपूर्ण पाऊल आहे । हेच देशप्रेम ही आहे.

**जय किसान ! जय ग्राम**









## Newspaper coverage

# पंधरा गावांत कापूस पिकाचे प्रात्यक्षिक प्रयोग

## केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचा उपक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

गिरड, ता. १३ : केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या विविध विविध शोध प्रयोगांची योग्यता तपासण्यासाठी समुद्रपूर तालुक्यातील पंधरा गावांतील १२० शेतकऱ्यांच्या शेतात कापूस पिकाचे आंतरपीक प्रात्यक्षिक देण्यात आले आहे.

केंद्रीय कापूस अनुसंधान संस्था आणि मगन संग्रहालय समितीच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. 'मेरा गाव मेरा गाव' या उपक्रमातून अल्पभूधारक व आदिवासी शेतकऱ्यांना कापूस बियाण्यांचे वाटप करण्यात आले एकदिवसीय कार्यशाळेत एकात्मिक कापूस पीकलागवड, व्यवस्थापन, कीड रोगाचे व्यवस्थापन आदी विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. मागील वर्षी गुलाबी बोंड अळीच्या प्रकोपाने पीक फस्त केल्याने शेतकऱ्यांपुढे मोठे आवाहन ठाकले आहे. बोंड अळीच्या गंभीर प्रश्नावर प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून एकात्मिक व्यवस्थापनाचे धडे शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे.

### विविध विषयांवर मार्गदर्शन

**कापूस पिकाची एकात्मिक लागवड, आंतरपिकांचा समावेश, सापळा पिके, एकात्मिक खत व्यवस्थापन, एकात्मिक कीड रोग व्यवस्थापन या विषयवार शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.**

यासाठी प्रत्येक महिन्याला शेतकऱ्यांची बैठक, प्रशिक्षण आयोजित करून शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना उद्भवणारे विविध प्रश्न सोडविण्यासाठी केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे प्रकल्प समन्वयक डॉ. एस. एम. वासनिक, डॉ. नंदिनी गोकटे-नरखेडकर, डॉ. शैलेश गावंडे, डॉ. सर्वानंद या शास्त्रज्ञांचा समूह कार्यरत आहे.

समुद्रपूर तालुक्यातील समुद्रपूर, गिरड, फरीदपूर, आवी, तावी, मोहगाव, शिवणफळ, पिंपळगाव, एदलाबाद, अंतरगाव, सावंगी, वडगाव, हिवरा, वाघेडा, जोगीणगुंफा गावातील १२० शेतकऱ्यांचा सहभाग या उपक्रमात आहे.



गिरड : प्रायोगीक तत्वावर शेतकऱ्यांना बियाणे देताना अधिकारी.

# बीज उत्सवात विविध विषयांवर चिंतन

## दोनशे शेतकऱ्यांचा सहभाग

**बीज उत्सवात चंद्रपूर, नागपूर, वर्धा, यवतमाळ जिल्ह्यातील दोनशेहून अधिक शेतकऱ्यांनी उपस्थिती दर्शविली. बीज उत्सवात तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाचा शेती करताना नक्कीच फायदा होईल, असे सांगितले.**

गिरड, ता. ६ : पर्यावरणदिनाचे औचित्य साधून गिरड येथील मगन संग्रहालय समितीच्या नैसर्गिक शेती विकास केंद्रात बीज उत्सव घेण्यात आला. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी देशी-पारंपरिक बियाणे संवर्धित करण्याचा संकल्प केला.

बीज उत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच विजय तडस, पं. स. सदस्य शेख इस्लाईल, डॉ. नंदिनी गोगटे- नरखेडकर, डॉ. विजया कुमारी आदींची उपस्थिती होती. बीज उत्सवात कापूस पिकाच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या विविध शेतीविषयक समस्यांवर केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांनी उपाययोजना सांगून मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेच्या प्रात्यक्षिक क्षेत्रावर निर्मित बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिले. शिवाय शेतकऱ्यांनी संवर्धित केलेले तूर, धान, हळद, पोपट, वाल, मिरची, चनोली, बंशी गहू, ज्वारी आदी २४ प्रकारचे बियाणे या बीज उत्सवात विक्रीस ठेवले होते. बीज उत्सवाच्या आयोजनाविषयी नैसर्गिक शेती विकास केंद्रप्रमुख गजानन गारघाटे यांनी प्रास्ताविक भूमिका मांडली.

'कापूस लागवड व व्यवस्थापन' विषयावर मनोज गायधने यांनी देशी गायीच्या शेण, गोमूत्रापासून नैसर्गिक शेतीला लागणाऱ्या निविष्ठ निर्मित्तीचे तंत्र शेतकऱ्यांना पटवून दिले. नैसर्गिक कापूस उत्पादन व मागणी या विषयावर सेंद्रिय खादी उत्पादन विभागप्रमुख मुकेश लुथडे माहिती देताना म्हणाले, जागतिक पातळीवर खादीचे महत्त्व वाढल्याने सेंद्रिय खादीला मोठी मागणी आहे. शेतकऱ्यांना ज्या शेतीपद्धतीत अधिक नफा मिळते, ती शेती पद्धती स्वीकारणे काळाची गरज आहे. सेंद्रिय कापूस उत्पादन ते खादी निर्मितीची स्वतंत्र यंत्रणा उभारण्यास शेतकऱ्यांनी सहकार्य केल्यास राज्यात महत्त्वाकांक्षी आदर्श युनिट उभे राहील, असे मत व्यक्त केले. आयोजनासाठी सुरेश सेलोरे, शंकर भिसेकर, विष्णू ब्राह्मणवाडे, अनिल गुडधे, प्रमोद आस्कर आदींनी सहकार्य केले.

Produced and Published by: Dr Vijay N. Waghmare, Director, CICR
Chief Editor : Dr. S. M. Wasnik
Associate Editor, design & Media Support : Dr. M. Sabesh
Editors: Dr Dipak Nagrale, Dr H. B. Santosh, Dr D. Kanjana , Dr. Sain, Dr Rakesh Kumar & Dr Pooja Verma,

Citation : Cotton Innovate, Issue-4 Volume-6, 2018,
ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur.

Publication Note: This Newsletter presented online at http://www.cicr.org.in/cotton_innovate.html

Cotton Innovate is the Open Access CICR Newsletter

The Cotton Innovate – is published weekly by
ICAR-Central Institute for Cotton Research
Post Bag No. 2, Shankar Nagar PO, Nagpur 440010
Phone : 07103-275536; Fax : 07103-275529;
email: cicrnagpur@gmail.com, director.cicr@icar.gov.in